**विशेष दिवाणी दावा नं.३२/२००७**

**निशाणी क्र. ३०२**

**वादीतर्फे साक्षीदार क्रमांक ४ यांची साक्ष.**

**मी शपथेवर निवेदन करतो/करते की,**

**नाव –** रमेश युवराज अब्दागिरे

**वय –** ५८ वर्षे **व्यवसाय – सचिव.**

**रा.** आष्टा. **ता**. वाळवा, **जिल्हा** –सांगली.

**सरतपासणी वादीतर्फे श्री. एम. एस. पाटील विधीज्ञ यांचेतर्फे**

मी कृष्णानगर सोसायटीमध्ये दिनांक ०१/०६/२०२३ पासून सचिव म्हणून कार्यरत आहे. आमच्या सोसायटीकडे उदयसिंह देशमुख यांनी कर्जाची मागणी केली होती. मागणीनुसार उदयसिंह देशमुख यांना पिक कर्ज रुपये ४,३५,०००/– दिले होते. तसेच त्यांना कंझम्पशन लोन रुपये २,१७,०००/– व सामान्य कर्ज रुपये ६,००,०००/– दिले होते. सदर कर्ज ७/१२ उताराच्या आधारावर दिले होते.

कर्जासंबंधीचे कागदपत्र दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला निशाणी २९० सोबत जोडलेला दस्त क्र. ७ ऊस कर्ज मागणी अर्जाचा तपशीलाची(सर्वसामान्य कर्ज) या न्यायालयाचे सहाय्यक अधिक्षक यांनी पडताळणी केलेली प्रत दाखविली, ती तीच असून त्यावर माझी सही, चेअरमन, बॅकेचे अधिकारी व पंचाच्या सह्या असून, त्यातील मजकूर सत्य व बरोबर आहे (त्यास **निशाणी ३०३** देण्यात येते). आता मला निशाणी २९० सोबत जोडलेला दस्त क्र. ८ ऊस कर्ज मागणी अर्जाचा तपशीलाची (ऊस कर्ज) या न्यायालयाचे सहाय्यक अधिक्षक यांनी पडताळणी केलेली प्रत दाखविली, ती तीच असून त्यावर माझी सही, चेअरमन, बॅकेचे अधिकारी व पंचाच्या सह्या असून, त्यातील मजकूर सत्य व बरोबर आहे (त्यास **निशाणी ३०४** देण्यात येते). आता मला निशाणी २९० सोबत जोडलेला दस्त क्र. ९ ऊस कर्ज

मागणी अर्जाचा तपशीलाची (कंझम्पशन) या न्यायालयाचे सहाय्यक अधिक्षक यांनी पडताळणी केलेली प्रत दाखविली, ती तीच असून त्यावर माझी सही, चेअरमन, बॅंकेचे अधिकारी व पंचाच्या सह्या असून, त्यातील मजकूर सत्य व बरोबर आहे (त्यास **निशाणी ३०५** देण्यात येते). आता मला निशाणी २९० सोबत जोडलेला दस्त क्र.१० एकत्रीत कर्ज खाते उताऱ्याची या न्यायालयाचे सहाय्यक अधिक्षक यांनी पडताळणी केलेली प्रत दाखविली, ती तीच असून त्यावर माझी सही असून, त्यातील मजकूर सत्य व बरोबर आहे (त्यास **निशाणी ३०६** देण्यात येते). उदयसिंह देशमुख यांना दिलेल्या कर्जाची नोंद त्यांचे ७/१२ उतारामध्ये झाली आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपासणी प्रतिवादी क्र. १–अ तर्फे श्री. पी. जे. पाटील विधीज्ञ**

प्रतिवादी क्र. १अ व त्यांचे विधीज्ञ वारंवार पुकारुनही गैरहजर. न्यायहितार्थ उलटतपास थोड्या वेळासाठी तहकूब.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत.

KARLEKAR BHAGWAN MAHAJAN

Digitally signed by KARLEKAR BHAGWAN MAHAJAN
Date: 2026.03.06 12:21:51 +0530

**इस्लामपूर** **( भगवान म. कारलेकर)**

**दिनांक – १७/०२/२०२६** **सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, इस्लामपूर.**

**मध्यंतरानंतर उलटतपासणी शपथेवर सुरु.**

**उलटतपासणी प्रतिवादी क्र. ३ व ५ तर्फे श्रीमती व्ही. एम. हेर्लेकर विधीज्ञ**

सध्या अनिल सरदेशमुख आमच्या सोसायटीचे चेअरमन आहेत. निशाणी ३०३ ते ३०५ वर चेअरमनची सही असल्याचे मी खोटे सांगत आहे, हे म्हणणे खोटे आहे.

प्रश्न – तुम्हाला पंचाची नावे सांगता येतात का ?

उत्तर – होय. रमेश दत्तात्रय पाटील व सचिन अशोक पवार हे पंच होते.

निशाणी ३०३ वर प्रतापराव माधवराव पाटील यांनी चेअरमन म्हणून सही केली आहे.

निशाणी ३०४ वर प्रतापराव माधवराव पाटील यांनी पंच म्हणून सही केली आहे. कर्ज कुणी घेतले याबाबत मला वैयक्तीक माहीती नाही, हे म्हणणे खोटे आहे. वादीला मदत करण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे, हे म्हणणे खोटे आहे.

**उलटतपासणी प्रतिवादी क्र. १–अ तर्फे श्री. पी. जे. पाटील विधीज्ञ**

प्रतिवादी क्र. १–अ व त्यांचे विधीज्ञ वारंवार पुकारुनही गैरहजर. सबब, उलटतपास काही नाही.

**उलटतपासणी प्रतिवादी क्र. ४ तर्फे श्री. डी. ए. जाधव विधीज्ञ**

प्रतिवादी क्र. ४ व त्यांचे विधीज्ञ वारंवार पुकारुनही गैरहजर. सबब, उलटतपास काही नाही.

**उलटतपासणी प्रतिवादी क्र. ६ विरुध्द दाव्याची सुनावणी एकतर्फा असल्यामुळे उलटतपास काही नाही.**

**उलटतपासणी प्रतिवादी क्र. ७ तर्फे श्री. ए.बी.पाटील विधीज्ञ**

प्रतिवादी क्र. ७ व त्यांचे विधीज्ञ वारंवार पुकारुनही गैरहजर. सबब, उलटतपास काही नाही.

**उलटतपासणी प्रतिवादी क्र. ८ विरुध्द दाव्याची सुनावणी एकतर्फा असल्यामुळे उलटतपास काही नाही.**

**उलटतपासणी प्रतिवादी क्र. ९ तर्फे श्री. टी. आर. कुंभार विधीज्ञ**

प्रतिवादी क्र. ९ व त्यांचे विधीज्ञ वारंवार पुकारुनही गैरहजर. सबब, उलटतपास काही नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत.

KARLEKAR BHAGWAN MAHAJAN

Digitally signed by KARLEKAR BHAGWAN MAHAJAN
Date: 2026.03.06 12:22:07 +0530

**इस्लामपूर** **( भगवान म. कारलेकर)**

**दिनांक – १७/०२/२०२६** **सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, इस्लामपूर.**